**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर,
संपादक/वृत्तसंपादक

7/8/2015

(हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
दूरध्वनी क्र.२२८१६६५६/२२८४१२५५

---

प्रसिध्दी पत्रक क्र.२९
दिनांक : ०७.०८.२०१५

## विना तिकीट प्रवास टाळा : प्रवाशांना आवाहन

मुंबई,०७ - बेस्ट बसगाडयामधून विना तिकीट प्रवास करणा-या प्रवाशांविरुध्द तसेच खरेदी केलेल्या तिकीटाने प्रमाणित केलेल्या अंतरापेक्षा जास्त प्रवास करणा-या प्रवाशांविरुध्द उघडण्यात आलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत **एप्रिल, मे आणि जून २०१५** या तीन महिन्यात **२६,०५९** प्रवासी आढळल्यामुळे त्यांच्याकडून **रु.२२,०७,१०७ /-** एवढी रक्कम दंडापोटी वसूल करण्यात आली.

विना तिकीट प्रवास करणा-या प्रवाशांनी प्रवास भाडे अधिक देय असलेल्या प्रवासी भाड्याच्या रकमेच्या दहापट रक्कम भरण्याचे नाकारल्यास मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ४६० (ह) अन्वये एक महिना पोलीस कोठडी किंवा **रु.२००/-** पर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा एकत्रितपणे देण्याची तरतूद आहे.

वस्तुत:, बसमधून प्रवास करताना योग्य तिकीट खरेदी करणे हे प्रत्येकाला बंधनकारक असून, विना तिकीट प्रवास करणे हा सामाजिक गुन्हा देखील आहे. तेव्हा सर्व प्रवाशांनी आपले आर्थिक नुकसान किंवा मानहानी टाळण्यासाठी योग्य तिकीट खरेदी करावे; तसेच तिकीटावर प्रमाणित केलेल्या अंतरा एवढाच प्रवास करावा, असे आवाहन बेस्टतर्फे करण्यात आले आहे.

---